# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.०१/०६/२०१९

## <u>दि.३१/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २०८/१९,भादविक ३२३,३४१,३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६०,रा.बिबवेवाडी कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम ३०ते ३५ वय निळया रंगाची जिन्स व काळया रंगाची पॅट |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०५/१९ रोजी सकाळी ११/३५ वा.वासुदेव फडके रोडवर,गणेश प्रसाद बिल्डींग समोर १८१४,सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया सदर ठिकाणी त्यांचे मुलीसह आल्या असताना,यातील नमुद इसमाने अचानक मोटार सायकलवरुन हेल्मेट घातलेल्या इसमाने,फिर्यादी समोर मोटार सायकल आडवी लावुन त्यांना हाताने मारुन,फिर्यादी यांचे गळयातील एकुण सोन्याचे मंगळसुत्र ६०,०००/-रु किमतीचे जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.व्हि.जाधव ९८५०९७५९२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४७७/१९,भादविक ३२६,३२४,३२३,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),मुंबई पोलीस अधि.३७(१)१३५,क्रिमिनल लॉ अमेंटमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | सागर गायकवाड,वय-२१ वर्षे,रा.वडार वस्ती,कृष्णानगर,महंदवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०५/२०१९ रोजी २१/०० वा. बुध्द विहार समोर,कृष्णानगर,महंदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मित्र विजय जाधव, शिवाजी गायकवाड, विकास गायकवाड, अरुण जाधव, अजय जाधव यांना यातील नमुद इसम हे लाकडी दांडक्याने व हाताने मारहाण करीत असताना,फिर्यादी यांनी तुम्ही भांडण का करीत आहात अशी विचारणा केली असता,सदर इसमांनी त्याचा राग मनात धरून,त्यांचे घरातुन कोयता आणला. त्यावेळी फिर्यादीं यांचे मामा सुरेश धांडे व बाबु कुऱ्हाडे हे दोघेही तेथे भांडणे सोडवण्यासाठी आले असता,त्यांनाही जीवे मारण्याची धमकी देवुन,त्याचेकडे असलेल्या कोयत्याने सुरेश धांडे यांचे डाव्या बाजुच्या कमरे जवळ पाठीवर व बाबु कुऱ्हाडे यांचे डोक्यावर वार करुन त्यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.एस.पाडवी ९८२३६६००७४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४७८/१९,भादविक ३२४,३२३,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,मुंबई पोलीस अधि. ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | जयेश भंडारी,वय-१८ वर्षे,रा.कृष्णानगर,महंमवाडी पुणे |
| **आरोपी** | एकुण १० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०५/२०१९ रोजी २१/०० वा. बुध्द विहार समोर,कृष्णानगर,महंदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बुध्द विहार समोर,कृष्णानगर,महंमदवाडी पुणे येथे त्यांचे मित्र संतोष राठोड व रजनी ऊर्फ महेश जगताप यांना त्यांचे वस्ती मध्ये राहणारे यातील नमुद इसम हे हाताने व लाकडी दांडक्याने मारहाण करीत असताना,फिर्यादी हे त्यांचेजवळ जावुन,तुम्ही भांडणे का करीत आहात. तसेच माझे मित्र संतोष राठोड व रजनी ऊर्फ महेश जगताप यांना का मारत आहात अशी विचारणा केल्याचे कारणावरून,त्यांनी चिडुन जावुन सर्वांनी फिर्यादीं व त्याचा भाऊ यश भंडारी तसेच संतोष राठोड व रजनी ऊर्फ महेश जगताप यांना लाकडी दांडक्याने व हाताने मारहाण करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. कैलास आकोटे ९८२३५१५३४४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २१४/१९,भादविक ३५३,३२३ ५०४,३४ |
| **फिर्यादी** | डॉ.प्रशांत दरेकर,वय-२७,रा.जेजुरी,ता.पुरंदर,जि.पुणे |
| **आरोपी** | १.विजय आप्पा मोहिते,वय-२९,रा.कोसेवाडी भवानी पेठ २.निखील शंकर आरणे,वय-२५, रा. सदर ३.शैलेश संजय कांबळे,वय-२०,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०५/२०१९ रोजी पहाटे ०२/३० ससुन हॉस्पीटल,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ससुन हॉस्पीटल,पुणे येथे आपत्कालीन वैद्यकीय अधिकारी या पदावर आहेंत. फिर्यादी ससुन हॉस्पीटल येथे रात्रपाळी डयुटी चालु असताना,यातील नमुद इसम हे त्यांचे गाडीला जामर लावला आहे तो काढुन दया असे सांगितले. त्यावेळी फिर्यादी यांनी तुम्ही गाडी जर आपत्कालीन विभागाचे समोरील नो-पार्कींग झोनमध्ये गाडी पार्क केली असेल तर तेथे जामर लावले जातात व त्याची रितसर पावती केल्यानंतर जामर काढला जातो असे सांगत असताना,ते पावती न करता गाडीचा जामर तोडत असताना,फिर्यादी यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता,सदर इसमांनी फिर्यादी यांचेसोबत वाद घालुन,त्यांना अपशब्द वापरून,धक्का-बुक्की करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जे.एम.पाटील ९५४९०००११८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १८७/१९,भादविक ३०६,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | सौ.स्मिता दशरथ सातपुते,वय-९६ वर्षे,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | एक इसम व दोन महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०४/२०१९ रोजी २०/२७ वा.चे पुर्वी मोतीराम अपार्टमेंट,उजवी भुसारी कॉलनी,पौड रोड,कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील मयत इसम राहुल दशरथ सातपुते,वय-४५,रा.मोतीराम अपार्टमेंट,उजवी भुसारी कॉलनी,पौड रोड, कोथरूड,पुणे यास यातील नमुद महिला त्याची पत्नी व तीचा भाऊ तसेच सासु यांनी संगनमत करून,नमुद वेळी व ठिकाणी राहुल यास कौटुंबिक कारणावरून वारंवार शिवीगाळ व मारहाण करुन,त्याचा सतत अपमान केल्याने,त्यांनी दिलेल्या मानसिक त्रासामुळे राहुल याने त्याचे जीवास कंटाळुन रेल्वेखाली आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.एम.देवकर ८८८८८४०२२९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ४६८/१९,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | ज्योती चिखले,वय-४२ वर्षे,रा.महादेवनगर,मांजरी-खुर्द,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | एक घरकाम करणारी महिला,वय-३४ वर्षे,रा.मांजरी-खुर्द,ता.हवेली,जि.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ ते दि.०५/०५/२०१९ रोजीचे कालीवधीत फ्लॅट नं.५०६,महादेवनगर,मांजरी बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे येथुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे घरी घरकाम करणारी यातील नमुद महिला हिने फिर्यादी यांचे राहते घरी घरकाम करीत असताना,तीने फिर्यादी यांची नजर चुकवनु,त्यांचे घरातील १४,०००/- रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ४,७४,०००/- रु किचा ऐवज चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिलेने गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.डी.गाडे ८८८८८७९९६९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**